दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● सोमवार १५ जूले २०२४ ● आरएनआय–एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३३३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077

# मराठ्यांना आरक्षण देऊ नये म्हणून फडणवीस यांचा दबाव?, मनोज जरांगे यांचा गंभीर आरोप

## फडणवीस यांचा दबाव

**शंभूराजे देसाई यांनी सरकारचे काम सुरू आहे असे विधान केले आहे. यावर जरांगे म्हणाले की आम्ही कधी म्हणलं तुमचं काम सुरू नाही म्हणून, आणि कधी म्हणणारही नाही. मात्र मला माझ्या समाजासाठी काम करणं महत्त्वाचं आहे. एक महिन्याचा वेळ दिला या महिन्यात काय झालं काय केलंय हे आमच्या लक्षात आलं.आम्हाला मात्र 13 तारखेपर्यंत आरक्षण मिळणार नाही हे कळालं. बाकी आम्ही तुम्हाला दोष देत नाही आणि देऊन उपयोग ही नाही,आजपासून आमची पुढची रणनीती सुरू झाली आहे.आम्ही संयम बाळगला आहे. बहुतेक फडणवीस काम करू देत नसतील कारण त्यांना भुजबळ गरजेचे आहेत. देवेंद्र फडणवीस मराठ्यांना आरक्षण मिळू नये म्हणून दबाव घालत असतील असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.**




जालना : मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी काल संभाजीनगरात झालेल्या रॅलीत राज्य सरकारला अल्टीमेटम दिला होता. मराठ्यांना जर ओबीसीत आरक्षण दिले नाही तर आपण 20 तारखेला उपोषणाला बसू असा निर्वाणीचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत येण्याचा देखील इशारा दिला आहे. प्रकाश शेंडगे यांनी आता मनोज जरांगे यांच्या काल झालेल्या भाषणाच्या संदर्भात प्रतिक्रीया दिली आहे.आम्ही मुंबईत शांततेत का येऊ नये आणि आमचा हक्क मागू नये ? तलवारीची भाषा कोणी केली. माझा डाऊट कधी खोटा होत नाही. भुजबळाला कोणाचे पाठबळ आहे हे अख्ख्या महाराष्ट्राला माहिती आहे. एसटीतून आरक्षण भेटलं तर धनगर समाजाच्या मुलांना जास्त नोकऱ्या लागतील हे त्यांना माहिती आहे, हा लढा सामान्य धनगरांचा आहे, मात्र छगन भुजबळनी त्यांना काय शिकवलं हे माहीती नाही, प्रकाश शेंडगेंच्या बोलण्याला आम्ही गांभीर्याने घेणार नाही, कारण त्यांना आम्ही विरोधक मानलेलं नाही. धनगर आणि मराठ्यांचे काहीही वैर नाही असे मराठा नेते मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

## नांदलगाव ग्रुप ग्रामपंचायत च्या बोगस कामाची चौकशी करा श्री नानाभाऊ शिंदे



**गेवराई/प्रतिनिधी** गेवराई तालुक्यातील नाथापूर पासून जवळच असलेले सिंदफणा नदीच्या तिरावर असलेले नांदलगाव मालेगाव रामेश्वर ग्रुप ग्रामपंचायत असून नांदलगाव तीन ठिकाणी मालेगाव दोन ठिकाणी वस्त्या तीन तर वेगळ्याच नवीन झालेले सरपंच यांनी मग्रा रोहयो अंतर्गत मातोश्री पा दणन रस्ते गावांतर्गत सिमेंट रस्ते इतर सार्वजनिक कामाची चौकशी करण्यात यावी ही काम बोगस होत असून तात्काळ बंद करण्यात यावी इतर कामात पण सर्वसामान्य लोकां ची आडवणूक केली जाते . तीन गावच्या तीन विलार होत असून त्याची दखल घेतली जात नाही येत्या आठ दिवसात पंचायत समिती गेवराई बीड मा जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारीयांनी चौकशी केली नाही तर गावकऱ्यांच्या वतीने मी उपोषणास बसेल असा इशारा रामेश्वर गावचे माजी ग्रामपंचायत सदस्य युवा कार्यकर्ते श्री नानाभाऊ शिंदे बदामराव पंडित यांचे खंदे समर्थक यांनी गट विकास अधिकारी गेवराई मुख्याधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांना दिलेला निवेदनात म्हटले आहे .

## यशवंत महाविद्यालयात एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन

**नांदेड : प्रतिनिधी**
नांदेड : येथील यशवंत महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे दिनांक १६- जुलै रोजी बी.एस्सी. प्रथम वर्ष वर्गाच्या रसायनशास्त्र विषयाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. 'नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२०' नुसार रसायनशास्त्र अभ्यासक्रमात बदल करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थीकेंद्री असून रोजगाराभिमुख आहे.तसेच,या नवीन अभ्यासक्रमात वेगवेगळ्या ज्या शैक्षणिक पद्धती विकसित करण्यात येणार आहेत त्या विषयी या कार्यशाळेत चर्चा होणार आहे.आंतरविद्याशाखीय शिक्षणावर सुद्धा या ठिकाणी चर्चा होणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आयोजित




या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ.एम.के.पाटील हे मार्गदर्शन करणार असून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका प्रा. संगीता माकोणे ह्या उपस्थित राहणार आहेत.या कार्यशाळेसाठी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.डी. आर.मुंडे, डॉ.खाडे,प्रा. सुरेश ढगे,प्रा..योगेश नलवार,प्रा. जमन अंगुलवार,प्रा.कामीनवार,प्रा. अनिल चिद्रावार, डॉ.एस.बी.सिरसाट हे मार्गदर्शन करणार आहेत. यशवंत महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील माजी विभाग प्रमुख डॉ.महेश माळी (कळंबकर) व श्री जेठेवाड हे नुकतेच जून महिन्यामध्ये सेवानिवृत्त झाले आहेत.त्यानिमित्त त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम देखील यावेळी आयोजित करण्यात आलेला आहे. तरी,या एकदिवसीय शैक्षणिक कार्यशाळेचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एन.शिंदे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एम.ए.बसीर, डॉ.एस.पी.वर्ताळे,डॉ.एस.बी. जुन्ने,डॉ.व्ही.एन.भोसले,डॉ.एस.बी. सिरसाट,डॉ.एस.व्ही.खानसोळे,डॉ. के.एल.केंद्रे,डॉ.एम.डी.अंभोरे, डॉ.ए.एस.कुवर,डॉ.निलेश चव्हाण,डॉ. डी.एस.कवळे,प्रा. संतोष राऊत,प्रा. शांतुलाल मावसकर आदींनी केले आहे.

## सुरेश कुटे जालना पोलीसांच्या ताब्यात
## माजलगाव, बीड नंतर जालना पोलिसांनी घेतले ताब्यात

बीड/प्रतिनिधी ठेवीदारांचो पैस वेळेवर न मिळाल्याने, फसवणूक केल्याने ज्ञानराधा मल्टीस्टेटचे चे संचालक सुरेश कुटे, अर्चना कुटे, आशिष पाटोदकर सह संचालक मंडळावर बीड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाल्याने सुरेश कुटे यांनी माजलगाव नंतर शिवाजी नगर बीड पोलिसाच्या ताब्यात होते पोलीस कोठडी संपल्याने न्यायालयात हजर केले असता जालना येते गुन्हा नोंद



असल्याने त्यांना जालना पोलीस आणि ताब्यात घेतले असता झाला न्यायालयापुढे हजर केले असता जालना पोलीसाकडे ट्रांजेकट वॉरंट नसल्याने त्यांना बीड कारागृहात पाठवण्याचे आदेश देण्यात आले. जालना पोलीस ठाणे बाहेर ठेवणार नाही गर्दी करत “साहेब गोरगरिबाचे पैसे द्या” अशी विनवणी केली. कुटे वरील गुन्ह्याचे सत्र असेच सुरू राहणार असे ठेवीदारांनी सांगितले.




एड.सत्यनारायण ढाका यांचा ६१ पूर्ती सोहळा हिना फंक्शन हॉल येथे करण्यात आला त्यामध्ये सत्कार करताना वंचित बहुजन आघाडीचे नेते पुरुषोत्तम वीर, संपादक अमरजान पठाण, बालाजी जगतकर, गणेश शिंदे, अंकुश चव्हाण, दत्तात्रय सौंदरमल आदी दिसत आहेत.

## लाडकी बहिण योजनेसाठी तेजस अर्बनमध्ये सोमवारपासून कॅम्प ॲड.प्रकाश कवठेकर यांची माहिती

बीड: मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेचे फॉर्म भरून घेण्यासाठी माजी मंत्री सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली तेजस अर्बन बँकेच्या सर्व शाखांमध्ये विनामुल्य फॉर्म भरून देण्यासाठी सोमवारपासून कॅम्प सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती डोंगरकिन्ही जि.प गटाचे जि.प.सदस्य ॲड.प्रकाश कवठेकर यांनी दिली आहे. प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे,तेजस अर्बनच्या सर्व शाखांमध्ये कँम्प सुरु करण्यात येत आहे. बीड शहरातील बालेपीर, उखंडा, वैद्यकिन्ही, डोगरकिन्ही परिसरातील महीलांसाठी हा कॅम्प असेल. सदरील योजनेपासून एकही महिला वंचित राहणार नाही, या दृष्टिकोनातून जोपर्यंत परीसरातील सर्व महिलांचे अर्ज भरणे होत नाही, तोपर्यंत हा कॅम्प चालू राहणार आहे. सदरील कॅम्प हा दि.१५ रोजी पासून फॉर्म



भरण्यासाठी सकाळी ११ ते सांयकाळी ५ वाजेच्या दरम्यान सुरू राहिले. ज्या महिलांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे, त्या २१ ते ६५ वयापर्यंतच्या महिलांनी सहभागी होण्यासाठी अर्ज करू शकतात. अर्ज भरण्यासाठी आधार कार्ड, आधिवास प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी)/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळखपत्र/१५ वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड, यापैकी कोणतेही एक ओळखपत्र (३) उत्पन्न प्रमाणपत्र/ पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड, बँक पासबुक, अर्जदाराचा फोटो,महिलेचा जन्म परराज्यतील असल्यास पतीचे अधिवास प्रमाण पत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/१५ वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळखपत्र या पैकी कोणतीही एक ओळखपत्र आवश्यक आहे. असेही तेजस अर्बनचे चेअरमन ॲड.प्रकाश कवठेकर यांनी म्हटले आहे.

# हरिभाऊ गवते यांचे प्रयत्नाला यश गोविंदपूर ग्रामपंचायतचे एक वर्षापासून धूळखात पडलेले पाण्याचे फिल्टर चालू

मौजे गोविंदपूर तालुका माजलगाव जिल्हा बीड येथील ग्रंपंच्यतचे पिण्याचे पाणी शुध्दीकरणचे फिल्टर बसवण्यावत आले होते परंतु सन2021-22 मध्ये झालेल्या ग्रामपंचायतीचे झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ग्रामपंचायत गोविंद पूर येथून शिवनंदा रजेभाऊ गवते या सरपंच म्हणून निवडून आल्या असून अरुणा नामदेव पांच्यल यांची उपसरपंच पदी निवड करण्यात आली होती शिवनदा राजेभाऊ गवते यांनी सरपंच पदाचा पदभार खेतल्या नंतर त्यांनी गावामध्ये कोणतेही जनहिताचे काम.यांनी गावातील लोकांनी त्यांचेविरुड तक्रार दिल्यानंतरच अबड धोबड स्वरूपाचे व शासनाचे कोणतेही काम अंदाजपत्रकनुसार न करता शासनाची फसवणूक केली असेल बाबत ,तसेच त्यांनी पदाचा गैरवापर करून गावातील हनुमान देवस्थानचे जागेवर अतिक्रण केले असून ते तत्काळ हटविणेबाबत समंधित शासकीय कार्यालयात कायदेशीर तक्रारी दाखल केल्या असून गावातील सांडपाण्याचे देखील कोणतेही नियोजन केले नसल्याने गावात अनेक वेगवेगळ्या ठिकाणी दूषित पाण्याचे मोठमोठे गटार साचले असून त्यामुळं गावातील रोगराई पसरून लोक आजारी पडू लागले व समंधी ग्रामसेवक व सरपंच त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून गावातील लोकांचे जिविताशी खेळू लागले सदरची गोष्ट लक्षात आल्यानंतर मौजे गोविंदपूर येथील गावातील लोकांचे सोयीसाठी सदैव तत्पर असलेले सामाजिक कार्यात तत्पर असणारे हरिभाऊ गवते,मदन गवते,शामसुंदर पांचाळ, ठकाजी गायकवाड, खेमजि गवते,अप्पा गवते,शरद गवते जानकीराम कुंडकर,नामदेव गायकवाड, यांनी गावातील पिण्याचे पाण्याचे फिल्टर तत्काळ चालू करणेसाठी अनेक तक्रार देऊ.खूप मोठा पाठपुरावा केल्यानं त्यांचे पाठतपुरव्याची वरिष्ठ कार्यालयाने तत्काळ दखल घेऊन फिल्टर तत्काळ चालू करण्यात आले आहे



# मराठा संघर्ष योद्धा जरांगे पाटलांच्या विरोधात आक्षेपार्ह वक्तव्य प्रकरणात अटकेची मागणी ; नेकनुर पोलिस स्टेशनला निवेदन

**नेकनुर प्रतिनिधी**

नेकनुर:- (दि.१४) लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत बीड जिल्ह्यातील दोन्ही समाजातील काही समाजकंटकांनी सोशल मीडियावर नेतृत्वाबद्दल परस्पर विरोधी आक्षेपार्ह वक्तव्य करण्याचा प्रकार घडुन संबंधित प्रकरणात पोलिस प्रशासनाकडून सायबर क्राईम अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.मात्र निवडणुकीनंतर महिना उलटुनही असे प्रकार थांबायला तयार नाहीत. दि.१२ रोजी पाटोदा तालुक्यातील नायगाव येथील रहिवासी प्रमोद सर्जेराव वनवे आणि संदिप शंकर वनवे यांनी मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या बद्दल आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल सार्वजनिक ठिकाणी आक्षेपार्ह विधान केल्याचा व्हिडिओ विविध सोशल मिडीयावर




प्रसारीत होत असुन संबंधित प्रकरणात पाटोदा पोलिस स्टेशन येथे मराठा सेवक सुरेंद्र तिपटे यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत २९६,३५३,३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. मराठा आणि वंजारा या दोन समाजामध्ये जाणिवपूर्वक द्वेष भावना भडकाऊन सामाजिक तेढ निर्माण करण्याचे हे षडयंत्र असुन समाजकंटकांना तातडीने अटक करण्यात येऊन कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी बालाघाटावरील मराठा सेवक शिवबा संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष दिपक जगदाळे,शिवशक्ती भिमशक्ती विचार मंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, अनिता कदम,आशा कदम, गयाबाई मोरे, शहाबाई कदम,डॉ.गणेश ढवळे, धडाडीचे युवक नेतृत्व विक्रांत वाणी,चिंतामण ढास, राजे भोसले,वंचितचे ज्येष्ठ नेते भिमराव पायाळ, महात्मा फुले समता परीषद युवानेते अशोक शिंदे, राष्ट्रवादी युवानेते रेवण येडे, नितिन येडे, बळीराम येडे, संतोष येडे, सुनिल सोनावणे, संतोष काटवटे,मधुकर काटवटे, दुर्योधन शेंडगे, विनोद जगताप,गोरख कदम, अनिल जाधव,ढास तुषार, अभिषेक मोहिते, शंकर काळे, गणेश शिंदे, आकाश मस्के, धनंजय काळे आदिंनी कालिका मंदिर पासुन घोषणाबाजी करत नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांना निवेदन देत तातडीने अटक करून कठोर कारवाईची मागणी केली.

# जिल्ह्यातील महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने चा लाभ उचलावा: जिल्हाधिकारी अविनाश पाठक

## योजनेचा लाभ पात्र महिलांपर्यंत पोहोचावा यासाठी तालुक्यांमध्ये केला दौरा

**बीड प्रतिनिधी**

बीड, दि. 14: बीड जिल्ह्यात महिलांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ मिळावा, यासाठी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये दौरा करून थेट महिला पर्यंत पोहोचून योजनेची माहिती दिली. शनिवारी सकाळपासून जिल्हाधिकारी श्री पाठक यांनी गेवराई जिल्ह्यातील गेवराई, वडवणी, पाटोदा, आंबेजोगाई, आष्टी आणि केज या तालुक्यातील नगरपंचायतीला, तसेच तालुक्यातील काही गावांमध्ये दौऱ्यादरम्यान मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेबाबतची माहिती दिली.

या योजनेअंतर्गत लागणाऱ्या कागदपत्र तसेच कोणाच्या माध्यमातून योजनेचा लाभ घेता येईल याबद्दल सांगितले. या योजनेचा लाभ पात्र महिलांनी उचलावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.



त्यांच्या या दौऱ्यामध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकान तसेच दौरा केलेल्या तालुक्यातील तहसीलदार त्यांच्यासह संबंधित विभागातील अधिकारी कर्मचारी आणि लाभार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. गेवराई तालुक्यातील मादळमोही, शिरूर तालुक्यातील तिंतरवणी, पाटोदा तालुक्यातील अमळनेर , पाटोदा नगरपंचायत, आष्टी नगरपंचायत, आष्टी तालुक्यातील मुर्शिदपूर, बीड तालुक्यातील लिंबागणेश, नेकनूर , केज नगरपंचायत, तालुक्यातील होळ, आंबेजोगाई नगरपंचायत, आंबेजोगाई तालुक्यातील पिंपळगाव, पुस, बदलापूर, लोखंडी, सावरगाव व हातोला या ठिकाणी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण याबाबत समक्ष भेटी देऊन या योजनेबाबतची माहिती दिली.

पात्र महिलांचा वयोगट 21 ते 65 असून या वयोगटातील लाभार्थ्यांची फॉर्म भरून घेणे व प्रत्यक्षात मार्गदर्शन करून संबंधित योजना बीड जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व ठिकाणी आढावा घेऊन या विषयी मार्गदर्शन केले.

यावेळी सर्व ठिकाणी ग्रामपंचायतचे सरपंच ग्रामसेवक अंगणवाडी पर्यवेक्षिका अंगणवाडी अंगणवाडी ताई बालविकास प्रकल्प अधिकारी संबंधित तालुक्याचे तहसीलदार उपविभागीय अधिकारी आष्टी मध्ये माजी आमदार सुरेश धस सर्व नगरपंचायत नगराध्यक्ष व संबंधित गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. संबंधित योजना ही बीड जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे राबविणेसाठी सर्वांनी सहकार्य करून ही योजना प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यात यावी, याबाबत माननीय जिल्हाधिकारी यांनी आव्हान केले व या योजनेमध्ये कुठलाही लाभार्थी वंचित राहणार नाही अशा प्रशासकीय सूचना संबंधित यंत्रणेला अशी पाठव यांनी यावेळी दिल्या.

# मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी शेतकरयांनी शेणखत, हिरवळीचे खत गांडुळ खताचा वापर करावा, कैलास पन्हाळकर

बीड प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्य बीड पाटोदा... वॉटरशेड ऑर्गनायझेशन पाटोदा विभाग शाश्वत उपजीविका प्रकल्पांतर्गत काकडहीरा गावच्या जैविक शेतीच्या विकासासाठी एक पाऊल पुढे घेण्यासाठी मा.विष्णुपंत जायभाय (मेजर ) मा.मोहन (नाना)जायभाय यांनी हाती घेतली असून आज वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट व ॲक्सिस बॅक फाउंडेशन च्या माध्यमातून काकडहिरा गावात लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब सेंद्रिय शेतकरी गट, जिजामाता स्यंयम साहायता शेतकरी गट, बळीराजा शेतकरी बचत गट या



तीन शेतकरी गटाच्या माध्यमातून 600 लिटर दशपर्णी तयार केला होता त्या दशपर्णी अर्काच्या विक्री चे उद्घाटन आज करण्यात आले यावेळी उपस्थित महिला व बालकल्याण प्रकल्प विकास अधिकारी महादेवजी जायभाये साहेब , वॉटर ऑर्गनायझेशन चे कैलास पन्हाळकर सर, कवठेकर भरत सर काकडहीरा सरपंच मा .संजयजी जायभाये, उपसरपंच साहेब,,,,,CRP राजू ताई जायभाय जिजामाता महिला स्वयंसहायता गटाने दशपर्णी तयार केला त्या गटाचे अध्यक्ष सिंधुबाई आघाव आणि सचिव शालन ताई आघाव उपस्थित होत्या यावेळी गावातील शेतकरी यावेळी माती परीक्षणाचे रिपोर्ट माहिती सांगून एका एका मुद्यावर चर्चा करून सविस्तर माहिती दिली आणि दशपर्णी अर्क माती परीक्षण रिपोर्ट वितरण केले . मातीच्या नमुन्या विषयी सविस्तर चर्चा होऊन सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी च्या उपाययोजना कुजलेले शेणखत, हिरवळीचे खत, गांडुळ खत वापरून आपण मातीचे आरोग्य सुधारू शकतो याची माहिती दिली.सेंद्रिय शेतीचे पुरस्कर्ते सन्माननीय श्री मोहन जायभाय श्री. विष्णुपंत जायभाय दशपर्णी अर्क वितरणाच्या माध्यमातून भेट देन्याचा योग आला... पाहून खुप आनंद वाटला....विशेष आवडली एक गोष्ट ती म्हणजे भरपूर प्रमाणात गावात परसबाग केलेल्या आहेत या मध्ये ही सेंद्रिय. गोष्टचा वापर केला आहे . पाहुन खुप आनंद वाटला.आपल्या मुलांच्या निरोगी आरोग्यासाठी विषमुक्त सेंद्रिय भाजीपाला खाने गरजेचे आहे ते कैलास पन्हाळकर सर यांनी परसबागेच्या माध्यमातून मार्गदर्शन केले... आज वॉटरशेड संस्थेच्या माध्यमातून काकडहीरा येथे महिलांनी तयार केलेले दशपर्णी आर्क महादेव जायभाय सरांनी परसबागेच्या भाजीपाल्यावर फवारणी साठी दिले.यावेळी पांडुरंग जायभाय सर पूर्ण मार्गदर्शन ऐकून घेतले आणि लगेचच या गटाकडून 4 बॉटल खरेदी केल्या खुप खुप अभिनंदन तुमचे व सर्व टिमचे शेवटी विष्णुपंत जायभाय मेजर वॉटरचे आभार व्यक्त केले आपला आम्हाला सार्थ अभिमान आहे असे त्यांनी त्यांच्या गाववाल्याचे वतीने म्हणाले ....!

# गेवराईच्या पालख्या डोंगर संवर्धन अंतर्गत निसर्गप्रेमी युवकांकडून १११ वृक्षांची लागवड

**गेवराई/प्रतिनिधी**

गेवराई शहराजवळील, गोविंद वाडी शिवारातल्या पालख्या डोंगरावर, खंडोबा मंदिराच्या परिसरामध्ये, खंडोबा डोंगर संवर्धन निसर्गप्रेमी, वृक्ष मित्रांच्या वतीने रविवार दिनांक १४ जुलै २०२४ रोजी कडुलिंब, वड व पिंपळ या तीन जातीच्या वृक्षाचे १११ रोपे लावण्यात आली.

पालख्या डोंगरावरील खंडोबा मंदिर परिसर, हिरवागार व्हावा,उजाड डोंगरावर सर्वत्र हिरवळ पसरावी, हा परिसर निसर्ग संपन्न दिसावा या उद्देशाने गेवराई शहरातील निसर्गप्रेमी, वृक्षप्रेमी,विविध क्षेत्रातील तरुणवर्ग व्यापारीवर्ग, व्यावसायिक, डॉक्टर्स, वकील,व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले तरुण युवक ज्येष्ठ नागरिक यांनी एकत्र येऊन, खंडोबा डोंगर संवर्धन वृक्ष समिती स्थापन केली आहे, या माध्यमातून पालख्या डोंगराचं रूप बदलवायचं ठरवलं आहे, वृक्ष लागवडीतून हा डोंगर परिसर हिरवा गार करायचा आहे, निसर्गाने समृद्ध करायचा आहे असे समितीने ठरवले आहे.

दिनांक १३ जुलै २०२४ रोजी जेसीबी मशीनच्या साह्याने १११ खड्डे तयार करण्यात आले आणि रविवार दिनांक १४ जुलै रोजी सकाळी त्या ठिकाणी कडुलिंब, पिंपळ, वडाचे रोपे लावण्यात आली आहेत. या कामासाठी खंडोबा डोंगर वृक्ष संवर्धन समितीच्या



अनेक सदस्यांनी श्रमदान करून आपले बहुमोल योगदान दिले आहे.

वृक्षमित्र संदीप साळवे, डॉक्टर अभिजीत येवले, व्यापारी महासंघाचे सुरेंद्र आप्पा रुकर, नगर परिषदेचे प्रकल्प अधिकारी राघव वाव्हळे, दिनेश औटे,यशवंत पाटील, रोहन पंडित, डॉ अशोक येवले, डेंटिस्ट डॉ गणेश फलके, दीपक कापसे गणेश बरकसे प्रकाश शेठ भुतडा, नंदकुमार जाजू,डॉ शाम झंवर,डॉ कासलीवाल, डॉक्टर ओमप्रकाश भुतडा,ऍड.प्रशांत वाघमारे , अभिजीत काला, बाबू खंडागळे, सुनील शेठ सोनी, सुरेश बर्गे,रामेश्वर अंतरकर,गणेश कोकाट, सूर्यवंशी सर, शिवाजी झेंडेकर सर, आदींनी याकरिता परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र प्राईड अवार्डने दत्तात्रय मुजमुले सन्मानित

## जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीने पटकावला मानाचा पुरस्कार

**केज/प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिर येथे दिनांक ७ जुलै रोजी राज्यस्तरीय सुपर अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यास्पर्धे दरम्यान अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालक दत्तात्रय मुजमुले यांना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्डने सन्मानित करण्यात येते.




महाराष्ट्रात सुपर अबॅकसचे जवळपास सर्वत्र सेंटर्स आहेत. त्यामध्ये अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या निवडक सेंटर्सना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्ड दिला जातो त्यामध्ये बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मौजे धनेगाव कॅम्प येथील जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालक दत्तात्रय मुजमुले यांना हा अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

हा अवॉर्ड प्रदान करण्यासाठी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ पायल चौबे , शिवसेनेचे (शिंदे गट)जिल्हाप्रमुख तथा माजी उपमहापौर छत्रपती संभाजी नगर राजेंद्र जंजाळ,सुपर अबॅकसचे सर्वेसर्वा मनीष महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# शिवसेना कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नोंदणीला प्रारंभ!

## बीडमधील महिला भगिनींनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा- अनिलदादा जगताप



**बीड/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक लोकप्रिय बनलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' या अभियानाचा शुभारंभ कार्यक्रम शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आज दि. १४ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे पार पडला. आजपासून दररोज सकाळी १०.०० ते सायं ०६.०० वाजेपर्यंत शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नोंदणी फॉर्म मोफत भरता येणार आहे. या योजनेपासून बीडमधील महिला वंचित राहू नयेत आणि बीडमधून जास्तीसजास्त महिलांना या योजनेचा लाभ घेता व नोंदणी फॉर्म भरताना महिलांची कुठलीही गैरसोय होऊ नये यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांनी जालना रोड येथील आपल्या स्वतःच्या शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नोंदणी सेंटरची स्थापना केली आहे. या शुभारंभ कार्यक्रमासाठी बीडमधील महिला भगिनींची मोठ्या संख्येत उपस्थिती होती. याबरोबरच शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, पदाधिकारी तथा लोकप्रतिनिधी या शुभारंभ कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

### सदरील अर्ज भरण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्र

1) आधार कार्ड (२) आधिवास प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी)/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळखपत्र/15 वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड यापैकी कोणतेही एक ओळखपत्र(३) उत्पन्न प्रमाणपत्र/पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड (४) बँक पासबुक (५) अर्जदाराचा फोटो (६) महिलेचा जन्म परराज्य तील असल्यास पतीचे अधिवास प्रमाण पत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/१५ वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळख पत्र या पैकी कोणतीही एक ओळखपत्र असणे अनिवार्य आहे.

# ओबीसी नेत्या पंकजा मुंडे यांची विधान परिषदेवर निवड,समाज बांधवांचा जल्लोष

**जालना/प्रतिनिधी**

जालना-माजी मंत्री तथा आ.पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांची विधानपरिषदेवर आमदार म्हणुन निवड केल्या बद्दल प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी,ग्रहमंत्री आमितजी शाहा,उपमुख्यमंत्री देंवेद्रजी फडणवीस,रावसाहेब दानवे या सर्वांचे आभार.आज पाच वर्षा पासुन ताईचा संघर्ष चालू होता.तो आज पुर्ण झाला आहे.भारतीय जनता पार्टी पक्षाने पंकजा ताई व ओबीसी समाजाला न्याय दिला.या बद्दल जालना जिल्ह्यासह,तालुक्यातील गोंदेगाव येथे भाजपा युवा मोर्चो जिल्हा उपाध्यक्ष बद्रीनाथ वाघ यांनी समाजबांधव व कार्यकत्या सोबत फटाक्याची आतिश बाजी व पेडे वाटुन आनंद साजरा केला.



# पाहेगाव येथील असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश:



**जालना/प्रतिनिधी**

-आज पाहेगाव तांडा,ता. जि.जालना येथील बंजारा समाजातील सतीश चव्हाण,रोहित चव्हाण,सचिन चव्हाण यांच्यासह अनेक युवकांनी मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे व विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे याच्या नेतृत्वामध्ये जाहीर प्रवेश केला.यावेळी भास्कर आबांनी नवयुवकांचे स्वागत करून पुढील पक्ष संघटन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी युवामोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे,जिल्हा उपाध्यक्ष संजय डोंगरे,तालुका उपाध्यक्ष मुकेश चव्हाण,गंभीरराव पडोळ गोवर्धन कोल्हे,दत्ता जाधव,निवृत्ती लंके,गोपाळ चौधरी,राम जाधव,मंगेश खरात,तालुका अध्यक्ष वसंतराव शिंदे,तालुका उपाध्यक्ष लाशिराम राठोड यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेत मजुर दलित महिलांना जातीवाचक शिवीगाळ, मारहाण.!अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट नुसार गुन्हा दाखल

**माजलगाव. प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील राजेगाव येथील दलित समाजातील काही महिला मारफळा तांडा,ता.गेवराई येथे शेतखुरपणी करण्यासाठी गेल्या होत्या. या महिलांनी खुरपणी कामाचे गुत्ते घेतल्यामुळे त्यांनी हे काम पूर्ण करून दिले मात्र शेताचे मालक अनिल गंगाधर राठोड यांनी या महिलांना काम एवढ्या लवकर कसे काय झाले म्हणत जातीवाचक शिवीगाळ मारहाण करून जखमी करून जीवे मारण्याची धमकी दिल्यावरून तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आला आहे. प्रकरणातील १०पिडीत महिलां पैकी एका पिडीतेन माजलगाव ग्रामिण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार दिनांक १३-७-२०२४ रोजी अनिल गंगाधर राठोड राहणार मारफळा तालुका तांडा तालुका गेवराई जिल्हा बीड यांच्या शेतात खुरपणीसाठी बोलावल्यामुळे सकाळी १०:०० वाजेच्या सुमारास त्यांच्या मार फळा येतील शेतात खुरपणीचे काम लागल्यामुळे गेले होते. सोबत रिक्षा चालक उमेश काळुबा साळवे असे सर्वजण मिळून गेलो होतो शेत खुरपल्या नंतर दुपारी ४:३०वा.च्या सुमारास अनिल गंगाधर राठोड, गंगाधर राठोड ही तेथे आला ते सर्वांना म्हणाला की, तुम्ही सर्व महिला माझ्याकडून ४८०० रु. गुत्ते म्हणून घेतले होते परंतु इतक्या लवकर शेत कसे काय खुरपले असे म्हणुन जातीवाचक शिवीगाळ केली. तर इतर अनोळखी तीन पुरुष व एक महिला यांनी चालक उमेश काळोबा साळवे यांचे गचुरे धरून खाली पडून लाथाबुक्क्यांनी यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व अनिल गंगाधर राठोड ,गंगाधर राठोड यांनी हातातील दगडाने मारहाण करून गंभीर जखमी केले. अशा आशयाच्या फिर्यादीवरून मुख्य आरोपी अनिल गंगाधर राठोड, गंगाधर राठोड व इतरांवर भा.न्या.सं. ११८(१), ११५, ३५२, ३५१(२), १८९(२), १९१(२), १९०, ३२४(४), ३(१)(r), ३(१)(s), ३(२)(va) नुसार तलवाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली तलवाडा पोलीस ठाण्याचे पोनि. सोमनाथ नरके हे करत आहेत.

# मुसळधार पावसाचा फटका, या जिल्ह्यांमध्ये शाळांना सुट्टी जाहीर



**मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व दिनांक ०२/०८/२०१९ च्या शासन परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या, अधिकारान्वये महाड, पोलादपूर आणि माणगांव या तालुक्यातील सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी, खाजगी प्राथमिक, माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये व आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षक केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था यांना दिनांक १५ जुलैला सुट्टी जाहीर करीत आहे. तथापि, या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज करावे, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.**

**प्रतिनिधी**

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये प्रचंड मुसळधार पाऊस पडत आहे. रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात प्रचंड पाऊस पडत आहे. मुसळधार पावसामुळे रत्नागिरी जिल्ह्यात दरड कोसळल्याचीदेखील घटना घडली आहे. यामुळे कोकण रेल्वे प्रभावित झाल्याचीदेखील माहिती समोर आली आहे. तसेच रायगड जिल्ह्यातही पावसाचा कहर बघायला मिळतोच. मुसळधार पावसाचा अंदाज पाहता रत्नागिरी जिल्ह्यात सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तर रायगड जिल्ह्यातील महाड, पोलादपूर आणि माणगाव या तालुक्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालये विद्यार्थ्यांना सोमवारी १५ जुलैला सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबत अधिकृत आदेश दिले आहेत. आदेशात नेमकं काय म्हटलं आहे?प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्वसूचनेवरून जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेवून, संपूर्ण जिल्ह्याकरिता अथवा जिल्ह्यातील स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत. संदर्भ क. २ कडील शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत, असं आदेशात नमूद करण्यात आलं आहे.भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार १४ जुलैला रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्टचा इशारा देण्यात आलेला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीमध्ये अतिवृष्टी होत आहे. वरील सर्व बाबी तसेच तहसीलदार, माणगाव, महाड आणि पोलादपूर यांच्या अहवालाचे अवलोकन करता महाड, पोलादपूर आणि गाणगांव या तालुक्यातील सर्व माध्यमांच्या शाळा आणि महाविद्यालये यांना सुट्टी जाहीर करणे आवश्यक असल्याचे माझे मत झाले आहे, असं जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात म्हटलं आहे.

## मुख्यमंत्र्यांची पंढरपुरात आषाढी आधी बुलेटवरुन पाहणी,



**प्रादेशिक/विशेष**

आषाढी एकादशीच्या सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सपत्नीक श्री विठ्ठलाची महापूजा करणार आहेत कसा असणार आहे त्यांचा दौरा, तसेच आषाढी यात्रा काळात मंदिरे समितीच्या भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधा, विठोबाचे २४ तास दर्शन या सर्व पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासन आता सज्ज झालं आहे. असं असताना एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या पंढरपूरच्या दौऱ्यावर आहेत. मुख्यमंत्री आज आषाढी एकादशी यात्रेच्या नियोजनाच्या कामांची पाहणी करत आहेत.

## अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार

**प्रादेशिक/विशेष**

अमेरिकेत आज एक खळबळ जनक घटना घडली आहे. आगामी राष्ट्रपती निवडणुकीत माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार करण्यात आला . शनिवारी संध्याकाळी सहा वाजून दोन मिनिटांनी अमेरिकेचे माजी राज्य राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे पेन सिल्वेनियाच्या बटलर मधील एका मैदानात रॅलीला संबोधित करत असताना त्यांच्यावर एका लांब आणि उंच इमारतीवर बसलेल्या एका क्षार्प शुटरणे गोळीबार केला ,।मात्र पुढच्या सेकंदात डोनाल्ड



ट्रम्प यांच्या सुरक्षेसाठी त्यांना असलेल्या स्नायपरणे सुटला ठार केले. अमेरिकेत बेकायदेशीर रित्या आलेल्या परदेशी नागरिकाबद्दल अध्यक्ष जो बायडेन यांच्या धोरणावर टीका करत असताना डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पाच गोळ्या घालण्यात आल्या .त्यातील एक गोळी ही डोनाल्ड ट्रम्प यांच्या कानाला चाटून गेली. यावेळी सिक्रेट सर्विस एजंट यांच्या दिशेने धाव घेत त्यांना सुरक्षित केले. तर याचवेळी सुरक्षेसाठी त्यांना असलेल्या स्नायपरणे शूटरला ठार मारले. डोनाल्ड ट्रम्प वर गोळी झाडण्या जाणाऱ्या व्यक्तीची ओळख पटली असून थॉमस मेथ्यू (वय २०) असे त्याचे नाव आहे. मात्र डोनाल्ड ट्रम्प यांना त्याला का मारायचे होते हा हेतू अद्याप स्पष्ट झालेला नाही.

# प्लास्टिक मुक्त शहर करण्यासाठी सर्वांचा पुढाकार महत्वपूर्ण -प्रियंका टोंगे

## रोटरी क्लब व नगरपरिषदेच्या वतीने बाजारात दोन हजार कापडी पिशव्यांचे वाटप

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

अंबाजोगाई प्लास्टिक मुक्त करण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. सर्वांच्या सहकार्याने ही चळवळ गतिमान होईल. असे प्रतिपादन नगर परिषदेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी केले रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व नगर परिषदेच्या वतीने जागतीक वर्ल्ड पेपर बॅग डे निमित्ताने शुक्रवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात दोन हजार कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मुख्याधिकारी प्रियंका टोंगे बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोलंकी, प्रकल्प संचालक विजयसिंह, ठाकूर, सह संचालक गोरख मुंडे, यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रियंका यांनी प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम सांगितले. पर्यावरणासाठी घातक असणारे प्लास्टिक निसर्गा समोर अनेक अडचणी करीत असल्याचे त्यांनी सांगितले यासाठी जनजागृती अभियान राबवून ही मोहीम गतिमान करण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. असे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय समारोप कल्याण काळे यांनी केला. यावेळी नगर परिषद हद्दीतील आठवडी बाजारा मध्ये व्यापारी व नागरिकांमध्ये प्लास्टिकचा पर्यावरणावर होणारा परिणाम, बंदी असलेले प्लास्टिक वापराबाबत दंडात्मक कारवाई इ बाबत जनजागृती करण्यात आली तसेच दुकानदार विक्रेते नागरिकां कडुन प्लास्टिक पिशवी जमा केल्या व कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले प्लास्टिकचा वापर टाळा व पर्यावरणाचा ह्रास टाळा. अश्या घोषणा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन विजयसिंह ठाकूर यांनी केले प्रास्ताविक. धनराज सोळंकी यांनी तर उपस्थितांचे आभार शकील शेख यांनी मानले या वेळी नगर परिषद अंबाजोगाई यावेळी बोलताना प्रियंका यांनी प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम




सांगितले. पर्यावरणासाठी घातक असणारे प्लास्टिक निसर्गा समोर अनेक अडचणी करीत असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी जनजागृती अभियान राबवून ही मोहीम गतिमान करण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. असे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय समारोप कल्याण काळे यांनी केला. यावेळी नगर परिषद हद्दीतील आठवडी बाजारा मध्ये व्यापारी व नागरिकांमध्ये प्लास्टिकचा पर्यावरणावर होणारा परिणाम, बंदी असलेले प्लास्टिक वापराबाबत दंडात्मक कारवाई इ बाबत जनजागृती करण्यात आली. तसेच दुकानदार, विक्रेते, नागरिकां कडुन प्लास्टिक पिशवी जमा केल्या. व कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले प्लास्टिकचा वापर टाळा व पर्यावरणाचा ह्रास टाळा. अश्या घोषणा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन विजयसिंह ठाकूर यांनी केले, प्रास्ताविक. धनराज सोळंकी यांनी तर उपस्थितांचे आभार शकील शेख यांनी मानले या वेळी नगर परिषद अंबाजोगाई कर्मचारी स्वच्छता निरीक्षक रमाकांत सोनकांबळे, शहर समन्वयक लखन ओव्हाळ. रोटरी चे राजेंद्र घोडके. डॉ निशिकांत पाचेगावकर, डॉ सुरेश अरसुडे, स्वरूपा कुलकर्णी रत्नओमकेश दहीफळे, शकील शेख, सुहास काटे, बाबुराव बाभुळगावकर, अंगद कराड यांची उपस्थिती होती

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077